# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

परिपत्रक : ४७९ / २०२२

**विषय : पीएच.डी. अभ्यासक्रमाची यापूर्वीची अपूर्ण प्रवेश प्रक्रिया असल्यास त्वरित पूर्ण करणेबाबत...**

मा. प्राचार्य/संचालक, सर्व मान्यताप्राप्त व संलग्नित संशोधन केंद्र यांना कळविण्यात येते की, या पूर्वीच्या २०२१ पेट परीक्षा उत्तीर्ण व सूट मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेलीच आहे. परंतु अद्यापही काही विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले नाहीत तसेच त्यांना संशोधन मार्गदर्शक देखील नियुक्त करण्यात आलेले नाहीत अशा स्वरूपाच्या अनेक तक्रारी विद्यापीठास प्राप्त होत आहेत. नुकतीच सर्व संशोधन केंद्रांची तपासणी करण्यात आलेली असताना देखील अशा स्वरूपाच्या काही तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त होत आहेत.

सदर बाब विचारात घेता, सर्व मा. प्राचार्य/संचालक, सर्व मान्यताप्राप्त व संलग्नित संशोधन केंद्र यांना कळविण्यात येते की, यापूर्वी झालेल्या प्रवेश प्रक्रियेत काही विद्यार्थ्यांना अद्यापही संशोधन मार्गदर्शक नियुक्त केलेले नसल्यास त्वरित संशोधन मार्गदर्शक नियुक्त करून अर्धवट राहिलेली प्रवेश प्रक्रिया दि. १५ जानेवारी २०२३ पर्यंत पूर्ण करावी. त्यानंतरच नव्याने **पीएच्.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यापीठ नियुक्त समिती सदस्यांची नावे कळविण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.**

26/12/2022

**सहायक कुलसचिव**
**शैक्षणिक प्रवेश**

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/६२४९
दिनांक : २६/१२/२०२२

प्रत :–

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

E:\PGSECTION\PH.D\PH.D. ADMISSION 2022-23\CIRCULAR.DOCX

Scanned with OKEN Scanner